फक्त पत्रिकाच नव्हे, तर विचारांचा एक मंच जो समाजाला बदलण्याची क्षमता ठेवतो...

Rotary
रोटरी क्लब लातूर

RID : 3132
CLUB NO. : 15520

# चक्रधर

**UNITE FOR GOOD**

अंक ७, फेब्रुवारी–२०२६



**रो. फ्रान्सेस्को अॅरेझ्झो**
अध्यक्ष-रोटरी आंतरराष्ट्रीय
(२०२५-२६)



**रो. सुधीर लातूरे**
प्रांतपाल
प्रांत - ३१३२ (२०२५-२६)



**रो. क्षितीज झावरे**
डिस्ट्रीक्ट गव्हर्नर नॉमीनी
२०२७-२८



**रो. जकी खान कायमखानी**
अध्यक्ष : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)



**रो. विश्वनाथ निगुडगे**
सचिव : रोटरी क्लब लातूर
(२०२५-२६)

**1** रोटरी क्लब लातूर ने समाजोपयागी कामांना प्राधान्य देत एकाच महिन्यांत अनेक कार्यक्रम घेत जनसामान्यांत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे सर्वरोगनिदान शिबीर घेत ९०० हून अधिक नागरिकांची तपासणी करून त्यांना औषधोपचार केले. शिवाय, डोळयांच्या ६० रूग्णांचे ऑपरेशन करून त्यांना नवी दृष्टी दिली.



सर्वरोग निदान शिबीर

**2** औसा तालुक्यातील गुबाळ येथील नांदुर्गा तांडा येथे भूकंपग्रस्तांसाठी १९९४ साली केरळच्या संस्थेने उभारलेल्या माध्यमम उर्दू प्राथमिक शाळेला भेट देवून तेथील पाहणी करून शाळेची डागडुजी करून त्याचे कलर काम करून, भींती बोलक्या केल्या. भूकंपग्रस्तांना रोटरी क्लब लातूरचा हा आधार विद्यार्थी, शिक्षक यांच्या चेहऱ्यांवरून स्पष्ट जाणवला. हे पाहून रोटरीयन्सना समाधान लाभले.



रोटरी हॅप्पी स्कूल

**3** सेवा आधार संस्था जी सर्वधर्मीय लावारीस मृतकांचे अंत्यसंस्कार त्यांच्या-त्यांच्या रितीरिवाजानुसार करून मानवकल्याणाचे कार्य पार पडते. अशा संस्थेला शीतशेवटी भेट देवून संस्थेच्या कार्यासाठी १ लाख रूपयांचा धनादेश रोटरी क्लब लातूरने दिला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेले आभार आणि रोटरी क्लब पदाधिकाऱ्यांनी केलेली ही छोटेखानी मदत आपल्या कार्यावर अभिमानाची मोहर उमटवणारी आहे.



शीतशवपेटी लोकार्पण

**4** एकात्मता, प्रेम, शांतता आणि सद्भावाचा हा सुरेख संगम फक्त साध्य करता आला तो रोटरी क्लब लातूरशी संलग्न असल्यामुळे. रोटरी क्लब लातूरचे सर्व रोटरीयन्सच्या सहकार्यामुळे व कार्यक्रमास विशेष उपस्थिती लावल्याने रो. सुधीर लातूरेजी आणि रो. क्षितीज झावरेजी यांचेही मन:पूर्वक आभार..!

रो. जकी खान कायमखानी



सेवा आधार संस्थेला देणगी

# दूरदृष्टी, नेतृत्व, कर्तृत्व, मैत्री आणि कृतीशीलता यांचा सुंदर संगम म्हणजे डीजीएन क्षितिज उदय झावरे

--- : परिचय :---

सामाजिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक अशी समृद्ध कौटुंबिक पार्श्वभूमी लाभलेल्या क्षितिज झावरे यांनी स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतर हेवी इक्विपमेंट्स आणि प्रिसाईज इंजिनिअरिंग या क्षेत्रांद्वारे औद्योगिक धातू बांधणी (इंडस्ट्रियल फॅब्रिकेशन) व्यवसायात प्रवेश केला.

थरमॅक्स, एल अँड टी, रिलायन्स या सारख्या नामांकित कंपन्यांसाठी भारतात आणि परदेशात काम करत असतानाच त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्था अंतर्गत मानव चंद्र मोहिम प्रकल्पासाठी विक्रम साराभाई अंतराळ केंद्रात तसेच संरक्षण संशोधन व विकास संस्था यांच्या उपक्रमांमध्ये प्रकल्प उभारणीची महत्त्वाची कामे केली आहेत.

२०१४ साली जर्मनीमध्ये आयोजित भारत-जर्मनी अक्षय ऊर्जा परिषदेत भारत सरकारतर्फे प्रतिनिधित्व करण्याची संधी त्यांना मिळाली. तसेच जर्मन सरकारतर्फे २६ दिवसांचा अभ्यास दौरा त्यांनी केला. याशिवाय २० हून अधिक देशांना दिलेल्या भेटी त्यांच्या व्यापक जागतिक दृष्टीकोनाची साक्ष देतात.

परंतु क्षितिज केवळ यशस्वी उद्योजकच नाहीत-ते एक बहुआयामी कलावंत देखील आहेत. नाट्य अभिनेता, दिग्दर्शक आणि लेखक म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धांमध्ये अभिनय आणि दिग्दर्शनासाठी शासनाचे अनेक राज्यस्तरीय पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. पाच चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिकांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका साकारल्या असून उत्कृष्ट अभिनयासाठी त्यांना झी मराठी पुरस्कारासाठी नामांकन देखील मिळाले आहे.

नाट्य परिषदेच्या स्थापनेपासून ते शंभराव्या नाट्यसंमेलनाच्या आयोजनापर्यंत त्यांच्या सक्रिय सहभागामुळे सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे.

२०१४ पासून ते रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाउनचे सक्रिय सदस्य आहेत.

२०१६-१७ मध्ये क्लब सचिव,

२०२०-२१ मध्ये क्लब अध्यक्ष म्हणून त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.



स्वतःच्या स्वप्नांपेक्षा मोठी आहे सेवा,
माणसाच्या वेदनेवर उत्तर ठरली नेवा.
पद नव्हे, प्रतिष्ठा नव्हे, ना सत्तेची आस,
कर्तृत्वातून उमटली क्षितीजची ओळख खास.

नेतृत्व म्हणजे पुढे चालणे नव्हे, सोबत घेणे,
अंधारात हात धरून प्रकाशाकडे नेणे.
जो स्वतःला झोकून जगाला उभं करतो,
तोच खरा 'क्षितिज' नाव धारण करतो.
कलेत संवेदना, सेवेत करुणेचा गंध,
कृतीत सातत्य, शब्दात आशेचा छंद.
सर्व रोटरीयन्सशी क्षितीजचे ऋणानुबंध
३१३२ क्लबला आहे क्षितीजमुळेच सुगंध...

कोरोना महामारीच्या कठीण काळात सर्व रोटरी क्लबांना एकत्र आणत १०० खाटांचे रोटरी कोविड केअर सेंटर उभारून दोन हजारांहून अधिक रुग्णांना विनामूल्य आरोग्यसेवा देणारा महत्त्वपूर्ण प्रकल्प त्यांनी साकारला. याशिवाय डायलिसिस केंद्र उभारणी, दुग्ध प्रकल्प उभारणी असे अनेक जागतिक अनुदान प्रकल्प त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केले.

२०२०-२१ साली तब्बल १९ पुरस्कारांसह सर्वोत्कृष्ट जिल्हा अध्यक्ष हा मानाचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला. यानंतर मानव विकास विभागातील सहयोगी संचालक, जिल्हा क्रीडा व संस्कृती संचालक, सहाय्यक राज्यपाल अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. पद कोणतेही असो, त्याला न्याय देत पूर्ण मनाने कार्यात झोकून देणे ही क्षितिज यांची खासियत आहे. रोटरी वर्ष २०२२-२३ मध्ये त्यांना सर्वोत्कृष्ट जिल्हा संचालक हा पुरस्कार मिळाला.

२०२४-२५ मध्ये रोटरी फाऊंडेशन जिल्हा संचालक म्हणून काम करताना जिल्ह्याने निधी संकलनात विक्रमी कामगिरी केली-

आजपर्यंतचा सर्वाधिक निधी, सर्वाधिक वार्षिक देणगी, सर्व क्लबचा सहभाग तसेच सर्वाधिक प्रमुख देणगीदार नोंदणी अशी उल्लेखनीय यशस्वी कामगिरी जिल्ह्याने साध्य केली.

२०२५-२६ मध्ये ते जिल्हा कृती आराखडा प्रमुख आणि जिल्हा अधिवेशन सचिव म्हणून नेतृत्वाची पुढील पायरी गाठत आहेत.

आजवर त्यांनी ५२ नवीन सदस्य रोटरी परिवारात जोडले, ५ जागतिक अनुदान प्रकल्प पूर्ण केले,

आणि प्रत्येक प्रकल्पात स्वतःला पूर्णतः समर्पित करणारा रोटेरियन म्हणून ओळख निर्माण केली.

या संपूर्ण प्रवासात त्यांच्या सोबत कायम उभ्या आहेत-त्यांच्या सुविद्य पत्नी रोटेरियन मधुरा झावरे. स्वतः जिल्ह्याचा सर्वोत्कृष्ट क्लब पुरस्कार मिळवणाऱ्या त्या सक्रिय रोटेरियन असून खऱ्या अर्थाने जीवनसाथी आहेत.

साहिल आणि प्रत्युष या दोन मुलांच्या सहवासामुळे क्षितिजजींचा जीवनप्रवास अधिक समृद्ध झाला आहे.

बाईकिंगची आवड, विविध स्थळांना भेटी देण्याचा छंद, चविष्ट पदार्थ बनवण्याची आणि मित्रमंडळींना खाऊ घालण्याची आवड, सुंदर गाणी गाणे, भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे आणि मित्रांच्या मैफिलीत रमणे-या सगळ्यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक रंगतदार बनते.

प्रेम, माणुसकी आणि चांगुलपणा या तत्त्वांवर दृढ विश्वास ठेवणारे, सर्वांना सोबत घेऊन चालणारे, अल्पावधीत जिल्हा राज्यपाल या पदापर्यंत पोहोचलेले, आपल्या जिल्हा ३१३२ चे सर्वात युवा डिस्ट्रीक्ट गव्हर्नर.

उत्कृष्ट कलाकार, प्रेरणादायी वक्ते, मित्रांचा खरा मित्र, आयुष्य भरभरून जगणारे आणि रोटरी परिवाराचे लाडके- रोटरी वर्ष २०२७-२८ चे नॉमिनी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर रोटेरियन क्षितिज उदय झावरे.

# रोटरी कार्याचा प्रेरणादायी प्रवास



प्रिय रोटरी परिवार,

पाहता पाहता रोटरी वर्षातील आठ महिने पूर्ण होत आले आहेत. या कालावधीत आपल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे क्लबने सुमारे ५० प्रकल्प यशस्वीरीत्या राबविले आहेत. समाजहिताच्या दृष्टीने घेतलेले हे उपक्रम आपल्या क्लबच्या सेवाभावाची आणि बांधिलकीची साक्ष देतात. या प्रत्येक प्रकल्पामागे सर्व रोटेरियन्सचे परिश्रम, वेळ आणि सहकार्य मोलाचे ठरले आहे. त्याबद्दल सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार.

आपल्या विविध कार्यक्रमांना प्रांतपाल डीजीएन रो. सुधीरजी लातूरे, रो. क्षितीज झावरे तसेच असि. गव्हर्नर रो. रविशंकर हिंगणे यांनी व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमांची शोभा तर वाढलीच, पण आपल्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली. विशेषतः प्रांतपाल रो. सुधीरजी लातूरे यांनी क्लबच्या उपक्रमांचे कौतुक करून केलेले गौरवोद्गार हे आपल्यासाठी प्रेरणादायी ठरले. डीजीएन रो. क्षितीज झावरे यांनी तर आपल्या क्लबच्या तीन महत्त्वाच्या प्रकल्पांसाठी सलग दोन दिवस दिले. या प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांनी आपल्या मनोगतात क्लबच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांच्या सोबत रो. मधुर बागायत यांनीही त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून दोन दिवस देऊन सहकार्य केले. त्यांच्या या सहकार्याबद्दल क्लबतर्फे मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो. आता रोटरी वर्षाचा उर्वरित काळ आपल्या समोर आहे. अजून अनेक उपक्रम आणि प्रकल्प पूर्ण करायचे आहेत. त्यामुळे वर्ष संपत आले म्हणून थांबायचे नाही; उलट अधिक उत्साह, समर्पण आणि जोमाने कार्यात झोकून द्यायचे आहे. आपला सेवाभाव, एकजूट आणि सहकार्य याच आपल्या क्लबची खरी ताकद आहे. लोकमत, लोकमत समाचार, दिव्य मराठी, एकमत आदी वर्तमानपत्रांनी रोटरीच्या कार्याची दखल घेत वेळोवेळी प्रसिद्धी देऊन जनसामान्यापर्यंत कार्य पोहोचविले. त्याबद्दल त्यांचेही आभार.

यापुढील सर्व प्रकल्प यशस्वी करण्यासाठी सर्व रोटेरियन्सचे सहकार्य आणि सहभाग अपेक्षित आहे. चला, समाजसेवेच्या या प्रवासाला अधिक उंची देऊया. सर्वांच्या सहकार्याच्या अपेक्षेने.

**- रो. जकी खान कायमखानी, अध्यक्ष**

# जिल्ह्यातील वैभवशाली रोटरी क्लब लातूर

**नमस्कार रोटरी मित्रांनो,**



दिनांक १३ आणि १४ फेब्रुवारी रोजी रोटरी क्लब ऑफ लातूरतर्फे आयोजित करण्यात आलेल्या तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांना उपस्थित राहण्याचा मला आनंददायी योग आला. रोटरी क्लब ऑफ लातूर हा आपल्या जिल्ह्यातील जुना आणि वैभवशाली क्लब म्हणून ओळखला जातो. या क्लबने आपल्या जिल्ह्याला तीन डिस्ट्रीक्ट गव्हर्नर दिले आहेत. सातत्याने विविध समाजोपयोगी उपक्रम राबवणारा आणि सेवाभाव जपणारा हा क्लब खऱ्या अर्थाने आदर्श ठरतो.

अध्यक्ष जकी खान यांचे प्रेमळ निमंत्रण, गेल्या महिनाभरापासून त्यांनी घेतलेला आपुलकीचा पाठपुरावा तसेच माजी जिल्हा राज्यपाल हरिप्रसाद सोमाणी यांचे हक्काचे आमंत्रण यामुळे आपल्या क्लबला भेट देताना अत्यंत आनंद, उत्साह आणि समाधान लाभले.

सर्व कार्यक्रम अध्यक्ष जकी भाई आणि संबंधित प्रकल्प अध्यक्ष डॉ. उत्तरेश्वर हेरकर आणि हर्षद राजूरकर यांनी अत्यंत सुयोग्य नियोजनाने आयोजित केले होते. वेळेचे काटेकोर नियोजन आणि कार्यक्रमातील शिस्त यामुळे प्रत्येक उपक्रम अधिक प्रभावी ठरला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ज्या तीन उपक्रमांचे उद्घाटन करण्याचा मान मला मिळाला, त्या उपक्रमांचे लाभार्थी प्रत्यक्ष भेटले तेव्हा जाणवले की हे उपक्रम खरोखरच योग्य ठिकाणी आणि गरजू लोकांसाठी राबवले गेले आहेत.

गुबाळ ता. औसा येथील शाळा, विद्यार्थी आणि शिक्षक हॅपी स्कूल प्रकल्पामुळे उत्साहाने भारावलेले दिसत होते. तसेच समाजसेवेच्या भावनेतून कार्य करणाऱ्या एका संस्थेला सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमातून शीत शवपेटी प्रदान करण्यात आली. या संस्थेने कोणत्याही आर्थिक मदतीशिवाय तब्बल २२०० अंत्यसंस्कार केले आहेत, हे ऐकून सर्वांचे मन हेलावून गेले. आपल्या क्लबने त्यांना एक लाख रुपयांची आर्थिक मदत देखील दिली.

पानगाव येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी कर्करोग तपासणी, डोळ्यांच्या मोफत शस्त्रक्रिया तसेच सर्वरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. समाजासाठी अत्यंत उपयुक्त असे हे उपक्रम खरोखरच प्रेरणादायी आहेत. या सर्व उपक्रमांच्या यशस्वी आयोजनाबद्दल अध्यक्ष जकी खान कायमखानी, क्लब सचिव विश्वनाथ निगुडगे आणि सर्व सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

या तिन्ही उपक्रमांच्या निमित्ताने क्लबच्या सर्व सदस्यांशी भेटण्याची आणि मनमोकळा संवाद साधण्याची संधी मिळाली. जकी भाईंनी केलेले स्वागत, आदरातिथ्य आणि प्रत्येकाने दाखवलेली आपुलकी मनाला स्पर्शून गेली. यालाच खऱ्या अर्थाने रोटरी भावना म्हणतात.

नगरचा क्षितिज झावरे म्हणून लातूरमध्ये माझे कोणतेही नातेवाईक किंवा मित्र नव्हते; पण आता आपल्या सर्वांच्या सहवासातून जिव्हाळ्याची अनेक नाती तयार झाली आहेत. ही नाती आयुष्यभर सोबत राहतील, याची खात्री वाटते.

डिस्ट्रीक्ट गव्हर्नर सुधीरजी लातूरे यांची दोन वेळा उपस्थिती, माजी जिल्हा राज्यपाल हरिप्रसादजी यांच्यासोबत साजरा केलेला वाढदिवस, आपल्या क्लबचे विविध उपक्रम, नियमित सभा आणि सर्व सदस्यांमधील मैत्रीपूर्ण नाते पाहून एक उत्कृष्ट क्लब कसा असावा याचे सुंदर उदाहरण मला अनुभवायला मिळाले. या दोन दिवसांत अध्यक्ष जकी खान कधी आपलेच जकी भाई झाले, हे आम्हा दोघांनाही कळाले नाही. मी नगरला सुखरूप पोहोचलो की नाही, याची आपण सर्वांनी घेतलेली काळजी मनाला भावली.

आपल्या क्लबला आणि सर्व सदस्यांना रोटरी कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. येत्या २३ फेब्रुवारी रोजी रोटरी संस्था १२१ वर्षांची होत आहे, त्या निमित्तानेही हार्दिक शुभेच्छा. असेच आपण सर्वजण एकत्र येऊन समाजासाठी कार्य करत राहूया. मला दिलेल्या प्रेमासाठी मी कायमच आपल्या ऋणात राहीन.

कायम आपलाच,

**रो. क्षितिज झावरे, डिजीएन नॉमिनी**



माध्यमम शाळेत हॅप्पी स्कूलचे उदघाटन करताना रो. डिस्ट्रीक्ट गव्हर्नर नॉमीनी क्षितीज झावरे, अध्यक्ष रो. जकी खान कायमखानी व रोटरीयन्स.

# रोटरी क्लब लातूरने माध्यमम उर्दू शाळेला दिले नवे रूप













लातूर : औसा तालुक्यातील गुबाळ येथील माध्यमम उर्दू शाळेला रोटरी क्लब लातूरने रोटरी हॅपी स्कूल उपक्रमांतर्गत नवसंजीवनी दिली आहे. प्लास्टर, फ्लोरिंग आणि रंगरंगोटी करून दिल्याने शाळेचे रूपडेच पालटले आहे. याशिवाय संपूर्ण शाळेला रंग देऊन भिंतींवर शैक्षणिक आणि आकर्षक चित्रे रंगविण्यात आल्याने शाळा अधिक बोलकी आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बनली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक तसेच शालेय प्रशासनाकडून रोटरी क्लब लातूरचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले.

सन १९९३ मध्ये किल्लारी परिसरात झालेल्या भीषण भूकंपानंतर शिक्षणाची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन माध्यमम ट्रस्टने किल्लारी आणि परिसराचा दौरा केला होता. त्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने गुबाळ येथे माध्यमम उर्दू शाळेची उभारणी करण्यात आली. ट्रस्टने पाच एकर परिसरात उभारलेली ही शाळा आजही ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र ठरली आहे.

मात्र आर्थिक परिस्थिती भक्कम नसल्यामुळे शाळेत आवश्यक सुविधांचा अभाव जाणवत होता. ही बाब लक्षात घेऊन रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी यांनी शाळेला भेट दिली. तेथील परिस्थिती पाहून त्यांनी रोटरी हॅपी स्कूल अंतर्गत प्लास्टर, फ्लोरिंग आणि रंगरंगोटी करून दिली. तसेच संपूर्ण शाळेला नव्याने रंग देऊन भिंतींवर शैक्षणिक आकृत्या आणि आकर्षक चित्रे रंगविण्यात आली. त्यामुळे शाळेचे वातावरण अधिक सुंदर, प्रेरणादायी आणि आधुनिक स्वरूपाचे झाले आहे.

सर्व काम पूर्ण झाल्यानंतर या नूतनीकरणाचा उद्घाटन सोहळा १३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी क्षितिज झावरे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, सचिव विश्वनाथ निगुडगे, प्रोजेक्ट चेअरमन, संस्थेचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना क्षितिज झावरे म्हणाले, ग्रामीण भागातील शाळा सक्षम झाल्या तरच देशाचा खरा विकास होईल. विद्यार्थ्यांना चांगले वातावरण, स्वच्छ आणि प्रेरणादायी वर्गखोल्या मिळाल्या तर त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. रोटरी क्लब लातूरने घेतलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून अशा उपक्रमांमुळे ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा मिळते.

तसेच अध्यक्ष जकी खान कायमखानी म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही उत्तम शिक्षणाची संधी मिळावी, हा रोटरीचा प्रयत्न आहे. शाळेचे वातावरण सुंदर आणि आकर्षक झाले तर विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची प्रेरणा मिळते. भविष्यातही अशा अनेक शैक्षणिक उपक्रमांद्वारे आम्ही समाजासाठी कार्य करत राहू.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन सर्व मान्यवरांचे स्वागत केले. रंगीबेरंगी चित्रांनी सजलेला शालेय परिसर अगदी बोलका दिसत होता. नव्या रूपात सजलेल्या शाळेकडे पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

रोटरी क्लब लातूरच्या या स्तुत्य उपक्रमाचे सामाजिक संस्था आणि नागरिकांकडून सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# रोटरी क्लबचे आभार..!




आजचा दिवस माध्यमम उर्दू प्राथमिक शाळा, नांदुर्गा तांडा (गुबाळ) साठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. रोटरी क्लब लातूर यांनी हॅपी स्कूल प्रकल्पा अंतर्गत प्लास्टर, फरशी काम आणि रंगरंगोटी करून दिली आहे. त्यामुळे आमच्या शाळेचे रूप अधिक आकर्षक, स्वच्छ आणि सुशोभित झाले आहे.

शिक्षणासाठी स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित वातावरण असणे अत्यंत महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांना आनंदी आणि प्रेरणादायी वातावरण मिळाले तर त्यांची शिकण्याची उत्सुकता आणि जिज्ञासा वाढते. रोटरी क्लब लातूर यांनी आमच्या विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी घेतलेली ही सकारात्मक पुढाकार खरोखरच कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी केलेले हे कार्य आम्हाला नवी ऊर्जा देणारे आहे.

मी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष मा. रोटेरियन जकी खान कायमखानी साहेब, सचिव मा. रोटेरियन विश्वनाथ निगुडगे साहेब आणि क्लबच्या सर्व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी आणि सेवाभाव या कार्यातून स्पष्टपणे दिसून येतो.

आज नव्याने सुशोभित झालेली ही वर्गखोली आमच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल आणि ते अधिक उत्साहाने शिक्षण घेतील, याची मला खात्री आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात शाळेबद्दल अधिक प्रेम आणि आपुलकी निर्माण होते.

शेवटी, पुन्हा एकदा रोटरी क्लब लातूरचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो आणि भविष्यातही असेच सहकार्य आमच्या शाळेला मिळत राहील, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**- सय्यद वाजीदअली सादतअली**
**मुख्याध्यापक**

# माध्यमम उर्दू शाळेतील काही क्षणचित्रे...














## Madhur Deepak Bagayat

BBA| MBA -HR | LLB | NLP Counsellor | Gràphologist | Business Coach |



He is a Behavioural Strategist and Life & Business Coach with 11+ years of industrial experience in leadership development and organizational transformation. Armed with expertise in HR, Psychology, NLP, and Graphology, Law , he mentors entrepreneurs across Maharashtra to build scalable, system-driven businesses through structured leadership and behavioural excellence.

A former Group Head at Klassic Wheels Ltd and an active Rotarian with Rotary International, he is currently serving as Youth Service Director and Secretary Elect (2026–27). Member Director of Natya parishad Ahmednagar, district officer Of Human Rights council.

# रोटरी क्लब लातूर आयोजित पानगावातील सर्वरोग निदान शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नऊशेहून अधिक गरजवंतांनी घेतला लाभ : रूग्णांच्या चेहऱ्यावर कृतज्ञतेचा भाव, ६० रूग्णांवर मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया**





पानगाव : ग्रामीण भागातील माणसाला आजारापेक्षा जास्त भीती असते ती उपचारांच्या खर्चाची. शहरांमध्ये अत्याधुनिक रुग्णालये, तज्ज्ञ डॉक्टर आणि आधुनिक उपकरणे सहज उपलब्ध असली तरी गावातील गरीब कुटुंबांसाठी ती केवळ दूरची स्वप्ने ठरतात. अशा परिस्थितीत एखाद्या गावातच मोठ्या प्रमाणावर मोफत आरोग्य शिबीर भरते, तज्ज्ञ डॉक्टर स्वतः येऊन तपासणी करतात आणि औषधेही विनामूल्य मिळतात, तेव्हा ते केवळ शिबीर राहत नाही–ते आशेचा किरण ठरते. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे रोटरी क्लब लातूरतर्फे आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबीर हे अशाच आशेचे आणि मानवतेचे सुंदर उदाहरण ठरले.

रोटरी क्लब लातूर आयोजित रोटरी सॅटेलाईट क्लब ऑफ लातूर ॲस्पिरेशन, विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल लातूर, शंकरसेठ साबळे आय हॉस्पिटल व एच.व्ही. देसाई आय इन्स्टिट्यूट सोलापूर, सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन आणि भोसले हॉस्पिटल यांच्या संयुक्त सहकार्याने या शिबिरात एकाच दिवशी ९०० हून अधिक रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. कर्करोग निदान, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच विविध आजारांचे निदान असे बहुआयामी आरोग्यसेवेचे चित्र या शिबिरात पाहायला मिळाले.

शिबिराचे उद्घाटन डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी क्षितिज झावरे यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लब लातूरचे अध्यक्ष जकी खान कायमखानी, पानगावचे माजी सरपंच सुकेश भंडारे, प्रोजेक्ट चेअरमन डॉ. उत्तरेश्वर हेरकर, हर्षद राजूरकर आणि अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामीण भागातील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळपासूनच रुग्णांची मोठी गर्दी दिसून येत होती.

या शिबिराचे विशेष आकर्षण म्हणजे विवेकानंद हॉस्पिटलच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेली कॅन्सर तपासणी व्हॅन. ग्रामीण भागातील अनेकांना कर्करोग तपासणीसाठी शहरात जाणे परवडत नाही. परंतु येथे अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने मोफत तपासणी झाली. अनेक रुग्णांमध्ये आजाराचे प्राथमिक निदान झाले आणि पुढील उपचारासाठी योग्य मार्गदर्शनही मिळाले.

नेत्र तपासणी विभागातही मोठ्या प्रमाणावर सेवा देण्यात आली. सोलापूर येथील शंकरसेठ साबळे आय इन्स्टिट्यूट आणि एच.व्ही. देसाई आय इन्स्टिट्यूट यांच्या सहकार्याने जवळपास ६० रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या, तसेच २०० रुग्णांना नंबरच्या चष्म्यांचे वाटप करण्यात आले. अनेक जणांना वर्षानुवर्षे अस्पष्ट दिसत होते; या शिबिरामुळे त्यांच्या डोळ्यांना पुन्हा प्रकाश मिळाला.

याशिवाय मधुमेह, ताप, सर्दी, खोकला, स्त्रीरोग, छातीचे आजार आणि इतर विविध व्याधींवर तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून औषधे मोफत दिली. डॉ. देविका बरुरे, डॉ. युनूसखान दुराणी, डॉ. संकेत लंपाटे, डॉ. महेश पवार, डॉ. अंजली टेकाळे, डॉ. भगवान अनामे, डॉ. पंकज भंडारे आणि डॉ. अर्चना कासले यांसारख्या तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची काळजीपूर्वक तपासणी केली.

रुग्णांच्या सोयीसाठी स्वतंत्र नोंदणी कक्ष, प्रतीक्षा व्यवस्था आणि मार्गदर्शन केंद्राचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे शिबिरात आलेल्या प्रत्येकाला सुसूत्र आणि सन्मानपूर्वक सेवा मिळाली.

आज ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती डळमळीत आहे. मोठ्या रुग्णालयातील उपचारांचा खर्च त्यांच्यासाठी परवडणारा नाही. अशा वेळी पानगावमध्ये भरलेले हे शिबीर म्हणजे गरजू लोकांसाठी मोठा आधार ठरले. अनेकांनी पहिल्यांदाच तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेतली, तर काहींना त्यांच्या आजाराबद्दल योग्य माहिती मिळाली.

रोटरी क्लब लातूरचा हा उपक्रम केवळ आरोग्यसेवा देणारा नाही, तर मानवतेची खरी ओळख करून देणारा आहे. समाजातील सक्षम घटकांनी पुढाकार घेतल्यास कित्येक गरजू लोकांचे जीवन उजळू शकते, याचा हा प्रेरणादायी नमुना आहे. पानगावच्या या शिबिराने ग्रामीण आरोग्यसेवेला नवी दिशा दिली आहे आणि समाजात सेवाभावाची ज्योत अधिक प्रखर केली आहे.

# मानवतेचा हात : सेवा आधार संस्थेला रोटरी क्लब लातूरची शीतशवपेटी व १ लाखांची मदत





**लातूर :** शहरात मानवतेचा एक प्रेरणादायी आणि भावनिक आदर्श निर्माण करणारी घटना नुकतीच घडली. रोटरी क्लब लातूरने समाजसेवेचा अनोखा संदेश देत श्री सेवा आधार मल्टीपर्पज चॅरिटेबल ऑर्गनायझेशन, लातूर या संस्थेला शीतशवपेटी भेट दिली तसेच एक लाख रुपयांचा धनादेश देऊन त्यांच्या कार्याला हातभार लावला.

श्री सेवा आधार मल्टीपर्पज चॅरिटेबल ऑर्गनायझेशन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत संवेदनशील आणि कठीण काम करत आहे. शहरात किंवा परिसरात सापडणाऱ्या अनोळखी मृतदेहांचे त्यांच्या धर्मपरंपरेनुसार सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करण्याचे पवित्र कार्य ही संस्था निस्वार्थपणे पार पाडत आहे. आतापर्यंत या संस्थेने २००० हून अधिक अनोळखी मृतदेहांचे अंत्यसंस्कार करून मानवतेचे जिवंत उदाहरण घालून दिले आहे.

या सेवाभावी कार्यामागे कोणताही आर्थिक लाभ नाही. उलट अनेक वेळा अंत्यसंस्काराचा खर्च भागवण्यासाठी संस्थेच्या कार्यकर्त्यांना स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करावे लागले, कधी कर्जही घ्यावे लागले. परंतु तरीही त्यांनी हे कार्य थांबवले नाही. कारण त्यांच्या मते, मृतदेह अनोळखी असला तरी तोही कोणाच्या तरी घरचा असतो; त्यालाही सन्मानाने निरोप मिळायलाच हवा.

अशा मानवतावादी कार्याची दखल घेत रोटरी क्लब लातूरने संस्थेला एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. तसेच अंत्यसंस्कार प्रक्रियेत मदत व्हावी म्हणून शीतशवपेटी भेट देऊन त्यांच्या कार्याला बळ दिले. या मदतीमुळे संस्थेचे काम अधिक सुलभ होणार असून अनेक गरजू आणि अनाथ मृतदेहांना सन्मानाने अंतिम निरोप देता येणार आहे.

या उपक्रमामुळे शहरात मानवतेचा सुंदर संदेश पसरला आहे. समाजासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या या संस्थेला मिळालेली ही मदत म्हणजे केवळ आर्थिक सहाय्य नाही, तर त्यांच्या कार्याची दखल घेणारा सन्मान आहे. रोटरी क्लब लातूरच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजसेवेच्या क्षेत्रात हा उपक्रम एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. श्री सेवा आधार मल्टीपर्पज चॅरिटेबल ऑर्गनायझेशन, लातूर या संस्थेला रोटरीने मानवता सन्मानपत्र देवून गौरव केला.

## क्षणचित्रे....













लातूर येथे रोटरी क्लबच्या वतीने श्री सेवा आधार संस्थेला शीतशवपेटीसह एक लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश देण्यात आला.

### शीतशवपेटीचा लातूरमध्ये अभाव पाहून रोटरीकडून भेट

**माणुसकीचा हात : एक लाखाची मदत**

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : रोटरी क्लब लातूरच्या वतीने श्री सेवा आधार मल्टीपर्पज चॅरिटेबल ऑर्गनायझेशनला शीतशवपेटी, एक लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश प्रदान ...

लातूर शहरातील हॉटेल एम्बसी येथे शुक्रवारी झालेल्या सोहळ्यात जिल्हा गव्हर्नर रोटेरियन सुधीर लातुरे यांच्या हस्ते हे साहित्य सुपूर्द करण्यात आले. यावेळी डीजीएन क्षितिज झावरे यांची प्रमुख उपस्थिती होती. श्री सेवा आधार संस्था ही गेल्या अनेक वर्षांपासून अनोळखी मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याचे काम करत आहे. आतापर्यंत या ...

स्वखर्चाने अंत्यविधी केले आहेत. सरपणाच्या उधारीने संस्थेवर दोन लाखांचे कर्ज असतानाही त्यांचे कार्य थांबले नाही. हीच सामाजिक बांधीलकी ओळखून रोटरी क्लबने मदतीचा हात पुढे केला आहे. या कार्यक्रमासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष जकीखान कायमखानी, पीडीजी हरिप्रसाद सोमाणी, सहायक गव्हर्नर रविशंकर हिंगणे यांच्यासह इतर ...

दिव्य मराठी लातूर जिल्हा 20-02-2026

### रोटरी क्लबचा माणुसकीचा हात; सेवा आधार संस्थेला मदतीचे बळ

प्रतिनिधी | लातूर

समाजातील बेवारस आणि अनोळखी मृतदेहांवर अंत्यसंस्कार करणाऱ्या 'श्री सेवा आधार मल्टीपर्पज चॅरिटेबल ऑर्गनायझेशन'च्या कार्याची दखल घेत रोटरी क्लब लातूरने मदतीचा हात दिला आहे. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ आणि 'ओम साई राम स्टील' यांच्या सीएसआर उपक्रमातून संस्थेला एक आधुनिक मॉर्च्युरी फ्रीझर बॉक्स आणि एक लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली.

हा सोहळा जिल्हा गव्हर्नर रोटेरियन सुधीर लातुरे यांच्या हस्ते व डीजीएन क्षितिज झावरे यांच्या उपस्थितीत पार पडला. श्री सेवा आधार संस्थेने आजवर सुमारे २००० हून अधिक बेवारस मृतदेहांचे अंत्यसंस्कार स्वखर्चाने केले ...

**सेवेचा सन्मान: तब्बल 2000 बेवारस मृतदेहांना विसावा**

श्री सेवा आधार संस्थेचे कार्य थक्क करणारे आहे. स्वतःकडे आर्थिक पाठबळ नसताना, प्रसंगी कर्ज काढून या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी २००० पेक्षा जास्त अनोळखी मृतदेहांना सन्मानाने निरोप दिला आहे. सरपणासाठी झालेल्या दोन लाखांच्या कर्जाचा डोंगर समोर असतानाही त्यांची जिद्द डळमळली नाही. रोटरी क्लबने दिलेला फ्रीझर बॉक्स आणि रोख मदत म्हणजे या निस्वार्थ सेवाव्रताला समाजाने दिलेली एक मोठी पावतीच ठरली आहे.

संस्थेवर कर्ज झाले असतानाही त्यांचे हे मानवतावादी कार्य अखंड सुरू आहे. या कठीण काळात रोटरी क्लबने दिलेली ही मदत संस्थेसाठी मोठा आधार ठरली ...

लोकमत समाचार

### मॉर्च्युरी फ्रिजर बॉक्स व एक लाख रु भेंट



लातूर में हाल ही में रोटरी क्लब ने श्री सेवा आधार मल्टीपर्पज चैरिटेबल ऑर्गनाइजेशन को मॉर्च्युरी फ्रिजर बॉक्स व एक लाख रुपए की सहायता दी.

लातूर : रोटरी क्लब लातूर की ओर से प्रेरणादायी व मानवतावादी कार्यक्रम पर अमल किया गया. रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 अंतर्गत सीएसआर ग्रांट क्रमांक सीएस-2500715 अंतर्गत प्राप्त हुए मॉर्च्युरी फ्रिजर बॉक्स व एक लाख रुपए की सहायता श्री सेवा आधार मल्टीपर्पज चैरिटेबल ऑर्गनाइजेशन को हाल ही में आयोजित समारोह में दी गई. फ्रिजर बॉक्स जिला गवर्नर रोटेरियन सुधीर लातूरे के हाथों व डीजीएन क्षितिज झावरे की उपस्थिति में सौंपा गया. समारोह में रोटरी क्लब की ओर से श्री सेवा आधार मल्टीपर्पज चैरिटेबल ऑर्गनाइजेशन को एक लाख रुपए की आर्थिक सहायता का चेक प्रदान किया गया. इस अवसर पर रोटरी क्लब के अध्यक्ष जकी खान कायमखानी, पीडीजी हरिप्रसाद सोमाणी, सहायक गवर्नर रोटेरियन रविशंकर हिंगणे, रोटरी सेटेलाइट अम्बिरेशन क्लब के पदाधिकारी, श्री सेवा आधार मल्टीपर्पज चैरिटेबल ऑर्गनाइजेशन के सदस्य व पदाधिकारी उपस्थित थे.

Apna Samachar
Page No. 3 Feb 19, 2026
Powered by: erelego.com